**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे ६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.**

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 5176/पीएस/2024

गुन्हा क्रमांक – 454/24

नि.क्र.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | :- | 15/6/24 |
| २. | अपराध नोंदविण्याचा दिनांक | :- | 15/6/24 |
| ३. | फिर्यादीचे नांव व पत्ता | :- | सरकार तर्फे सहा. पोलीस निरीक्षक,<br>**पोलीस ठाणे :** कस्तुरबा मार्ग |
| ४. | **आरोपीचे नांव, वय व पत्ता** | :- | कुमार प्रकाश साळुंखे<br>वय – 26 वर्षे,<br>रा. बोरीवली, मुंबई. |
| ५. | **आरोपाचा आशय** | :- | |

दिनांक 15/6/24 रोजी, रात्री 10.15 वाजताचे सुमारास हरिओम [illegible] कस्तुरबा रोड, बोरीवली (पू), मुंबई येथे आपण आपल्या ताब्यातील मोटरसायकल/वाहन हे हयगयीने व निष्काळजीपणे चालवली आणि याद्वारे आपण भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपल्या ताब्यातील वाहन इतरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे चालवले आणि याद्वारे आपण भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपल्या ताब्यातील वाहन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे निष्काळजीपणे चालवले आणि याद्वारे आपण मोटर वाहन कायदा अधिनियमचे कलम १८४ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

22.7.24

**( व्ही. एफ. चौगुले )**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

दिनांक : 22/07/2024

**<u>आरोपीचे निवेदन</u> :-**

प्र. १ : तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्र. २ : तुम्ही वकील नियुक्त केले आहे काय ?

उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला विधी सहाय्यता पाहिजे काय?

उत्तर : नाही.

प्र. ४ : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला आरोपाचा आशय समजला काय?

उत्तर : होय.

प्र. ५ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय, मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

समक्ष

22.7.24

**( व्ही. एफ. चौगुले )**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

दिनांक : 22/07/2024

**<u>नि. १ वर आदेश.</u>**

आरोपीने स्वतःहुन त्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्याने त्याची कमीत कमी दंडावर मुक्तता करण्यात यावी अशी या न्यायालयास विनंती केली आहे. मी आरोपीला त्याचेवर कोणाचा दबाव आहे काय? व तो स्वतःहुन गुन्हा कबूल करतो आहे काय? अशी विचारणा केली व गुन्हा कबूल केल्यास त्यास शिक्षा होऊ शकते याची कल्पना दिली व त्यास पुर्नविचार करण्याची संधी दिली, परंतू, तो त्याचेवर कोणचाही दबाव नाही व त्याला स्वतःहुन गुन्हा कबूल करावयाचा आहे असे कथन करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी स्वतःहुन गुन्हा कबूल करीत आहे व

त्याचेवर कोणाचाही दबाव नाही. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

: **आ दे श** :

१. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/– रुपये (पाचशे रुपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

२. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला २५०/– रुपये (दोनशे पन्नास रुपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

३. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला मोटर वाहन कायदा अधिनयमचे कलम १८४ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला ५००/– रुपये (पाचशे रुपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला ७ (सात) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

४. आरोपीला आदेशाची प्रमाणित प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)

22.7.24

( व्ही. एफ. चौगुले )

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

दिनांक : 22.7.24

रिसुह

Paid Rs. 1250/-

Recpt. No. H1954

Borivali Centre of Courts, Mumbai

22/7/24